संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
21 JUL 2026
प्राप्त झाले सही..........

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उपसंचालक संवर्गातील अधिकाऱ्यांना सह संचालक पदावर तात्पुरती पदोन्नती व पदस्थापना...

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**

शासन आदेश, क्रमांक :-संलेको २०२६/प्र.क्र.४६/कोषा. प्रशा.२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- २१.०७.२०२६.

**<u>शासन आदेश</u>**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, उपसंचालक संवर्गातील (एस-२३ : ६७७००-२०८७००) खालील विवरणपत्रात नमूद अधिकाऱ्यांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहसंचालक संवर्गात (एस-२५ : ७८८००-२०९२००) पदाचा कार्यभार स्विकारतील त्या दिनांकापासून खालील अटींच्या अधिन राहून तात्पूरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून, पदोन्नत अधिकाऱ्यांना महसूल विभाग वाटप नियम, २०२१ मधील तरतूदीनुसार स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या महसूल विभाग वाटपानुसार स्तंभ क्र.४ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | वाटप करण्यात आलेला महसूल विभाग | तात्पुरत्या पदोन्नतीची पदस्थापना |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री.विक्रमसिंह उज्वलसिंह यादव | कोकण-२ | वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई |
| २ | श्री.दत्तदास यशवंत कराडकर | कोकण-२ | सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण विभाग, नवी मुंबई |
| ३ | श्री.चंद्रकांत उत्तमराव पाटील | कोकण-२ | प्रकल्प व्यवस्थापक-वित्त (सहसंचालक लेखा), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई |
| ४ | श्री.जनार्दन हरी खोटरे | कोकण-२ | सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई |
| ५ | श्रीम.राजश्री शिवाजीराव पाटील | कोकण-२ | वरिष्ठ लेखा अधिकारी, सिडको प्राधिकरण, नवी मुंबई |
| ६ | श्रीम.प्रगती एकनाथ धनावडे | कोकण-२ | अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई |

२.	महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील वरील तक्त्यात नमुद उपसंचालक संवर्गातील अधिकाऱ्यांना खालील अटींच्या अधीन राहून सहसंचालक संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

(अ) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील निर्णयास अधीन राहून पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि.०७.०५.२०२१ मधील तरतूदीनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात येत असून मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे दाखल केलेल्या मूळ अर्ज क्र.२१५/२०२३ नुसार उपरोक्त विवरणपत्रातील अधिकाऱ्यांना तात्पूरत्या स्वरुपात पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

(ब) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क राहणार नाही.

(क) वरील अधिकाऱ्यांनी आपल्या पदोन्नत पदाचा कार्यभार या आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत स्वीकारावा व कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्र या विभागाकडे सादर करावे. विहित कालावधीत नियुक्ती न स्विकारल्यास अथवा पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्यासाठी मुदतवाढ न मिळाल्यास पदोन्नतीचे आदेश रद्द करण्यात येतील.

३.	उपरोक्त पदोन्नत अधिकाऱ्यांना शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२ दि. १४.०७.२०२१ मधील सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(वि. अ. धोत्रे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर *
४) संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई.
५) संचालक, संचालनालय, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई *
६) संबंधित अधिकारी यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख *
७) संबंधित अधिकारी यांचे पदोन्नतीच्या पदाचे कार्यालय प्रमुख *

८) संबंधित अधिकारी *
९) प्रधान सचिव (ले. व को.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०) कक्ष अधिकारी, कोषा.प्रशा.१, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) निवड नस्ती कोषा.प्रशा.२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

* (संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)